| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 2 Oct 2024 | Pay vehicle insurance amount by kilometer | Kesari |

# किलोमीटरनुसार भरा वाहन विम्याची रक्कम

**गाडी चालवाल तेवढीच विम्याची रक्कम भरण्याची अनोखी योजना विमा कंपन्यांनी आणली आहे. ग्राहकांचा विचार करून सर्वसाधारण विमा कंपन्या ग्राहकाभिमुख सेवा देण्यासाठी आता पुढे येत आहेत. वैयक्तिक गरजेवर कंपन्या आता त्यावर लक्ष केंद्रित करू लागल्या आहेत. त्यातूनच त्यांनी गाडी चालवाल तेवढी विम्याची रक्कम (पे अॅज यू ड्राइव्ह) योजना राबविण्यास सुरूवातही केली आहे. त्यामध्ये बजाज अलियांझ या आघाडीच्या विमा कंपनीचाही समावेश आहे. विकसित देशांत अशा प्रकारे वाहनांचा विमा पूर्वीपासून काढला जात आहे. भारतीय बाजारपेठेतही पे अॅज यू ड्राइव्ह विमा योजना लोकप्रिय होत आहे. ती नेमकी काय आहे ? हे आता पाहुया...**

जनरल इन्शुरन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या नुसार भारतातील ६० टक्के वाहने विम्याशिवाय धावतात. २०१४ –२०१६ दरम्यान, १९ कोटी वाहनांची नोंदणी झाली होती. त्या पैकी अर्ध्यापेक्षा कमी म्हणजेच ८.२६ कोटी वाहनांचा विमा उतरविला होता. एकंदरीत विम्याचे कवच असलेली आणि नसलेल्या वाहनांतील तफावत मोठी आहे. त्यामुळे वाहनासह मालकाच्या विम्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अनेक चालक वाहनांचा विमा काढणे अनावश्यक खर्च समजतात. तो काढण्याकडे दुर्लक्ष करतात. अनेकदा पॉलिसीची मुदत संपते. त्यानंतर नूतनीकरण केले जात नाही. त्यामुळे विमा कंपन्यांनी आता गाडी चालवाल तेवढी विम्याची रक्कम (पे अॅज यू ड्राइव्ह) योजना आणली आहे. चालक वर्षात किती किलोमीटर वाहन चालवतो ? यावर विम्याचा हप्ता ठरणार आहे. त्यासाठी विमा कंपनी टेलिमॅटिक उपकरण वाहनात ठेवेल किंवा चालकाने दिलेल्या किलोमीटरच्या आकडेवारीनुसार विम्याची रक्कम आणि हप्ता ठरणार आहे.

चालक किती वाहन चालवितो ? त्यानुसार तो विमा योजना स्वीकारू शकतो. किलोमीटरनुसार तो आता हप्ता भरू शकणार आहे. योजनेनुसार विमा कवच तर मिळणारच आहे. तसेच सुरक्षित वाहन चालविले तर बक्षीसही दिले जाणार आहे. त्यामुळे सुरक्षित वाहन चालविण्याला प्रोत्साहन मिळणार आहे. अधिकाधिक वाहने योजनेत समाविष्ट झाली तर, अर्थव्यवस्थेला हातभार लागणार आहे. प्रत्येक घरात अनेक वाहने असतात. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीसाठी पायाभूत सुविधा वाढणार आहेत. पे अॅज यू ड्राइव्ह योजनाही दिवसेंदिवस लोकप्रियही होत चालली आहे. सध्या ती वाहनचालकांची गरजही बनली आहे. वैयक्तिक आणि खिशाला परवडणारी देखील आहे.

**पे अॅज यू ड्राइव्ह कवच काम कसे करते ?**

वाहनांच्या किलोमीटरनुसार विमा कवच दिले जात असल्याने योजना तशी लवचिक आणि हप्त्याची रक्कम वाचविणारी आहे. वाहनाने दिवसाला सरासरी किती अंतर कापले किंवा वर्षात ते किती किलोमीटर धावले ? यानुसार हप्ता काढला जातो. या दरम्यान, थर्ड पार्टी इन्शुरन्स वर्षभर लागू असतोच. किलोमीटरची मर्यादा संपली की, वैयक्तिक नुकसानीपोटी दिले जाणारे कवच संपते. विमा धारक किलोमीटर वाढवून अतिरिक्त विमा हप्ता जमा करून विमा



**सुभाशिष मुजुमदार**
वाहन वितरण प्रमुख,
बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स

कवच पुन्हा प्राप्त करू शकतो. पे अॅज यू ड्राइव्ह योजनेनुसार वर्षाला कमीत कमी अडीच हजार किलोमीटरपासून विमा कवच प्राप्त करता येते. तसेच पाच हजार, सात हजार ५०० आणि १० हजार किलोमीटरचा वाहनाचा विमा काढता येतो. ग्राहकाने किलोमीटरची मर्यादा ओलांडली नाही तर, विम्याचे नूतनीकरण करताना अतिरिक्त किलोमीटर त्याच्या नूतनीकरण केल्या जाणाऱ्या विमा कवचात समाविष्ट केले जातात. त्यामुळे किलोमीटरची मर्यादा पूर्ण केली नाही तर काय ? असा प्रश्न ग्राहकासमोर उभा राहात नसल्याने त्यांची याबाबतची चिंताही मिटते.

**विमा कवच कोणी घ्यावे आणि त्याची गरज काय ?**

वाहन मालकांना सुलभ आणि सोईस्कर विमा कवच हवे असते. ते डिजिटल स्वरुपात आणि आवश्यक किलोमीटरप्रमाणे असावे, अशी त्याची अपेक्षा असते. ही गरज पे अॅज यू ड्राइव्ह योजनेतून पूर्ण होते. किलोमीटरप्रमाणे विमा कवच आणि हप्ता स्वीकारला जात असल्याने एकंदरीत विम्याची रक्कमही कमी होते. जी मंडळी वारंवार वाहनांचा वापर करत नाहीत. त्यांच्यासाठी योजना उत्तम आहे. अनेकदा काही जण लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी वाहन चालवत असतात. अनेकांकडे एकापेक्षा अधिक वाहने असतात. त्यामुळे वाहने उभीच असतात. अनेकदा काही जण सार्वजनिक वाहनांचा प्रवासासाठी वापर करतात. त्यांच्यासाठी पे अॅज यू ड्राइव्ह योजना फायदेशीर ठरणार आहे.

**विमा घेताना काय लक्षात घ्यावे ?**

**वाहन चालविण्याची सवय** : वर्षात किती किलोमीटर वाहन चालविले जाते. याचा विचार करावा. त्यानुसार किलोमीटरचा टप्पा निवडावा. त्यामुळे जास्त किलोमीटर वाहन चालविल्यास अतिरिक्त रक्कम भरावी लागणार नाही.

**विमा कवचाच्या मर्यादेचा विचार करावा** : किलोमीटरची मर्यादा ओलांडली तर वैयक्तिक नुकसान कवचापासून ग्राहक मुकणार आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसार किलोमीटरचा समावेश विम्यासाठी करावा. त्यासाठी अतिरिक्त हप्ता लागू होतो.

**सवलत आणि टप्प्यातील फरक** : कमी किलोमीटरचा टप्पा असेल तर सर्वसाधारणपणे जास्त सूट मिळते, किलोमीटरचा टप्पा वाढला तर बचत कमी होते. त्यामुळे योग्य किलोमीटरचा टप्पा निवडून आणि हप्त्यासाठी किती खर्च होणार आहे ? याचा विचार करावा.

**टेलिमॅटिक्स आणि डाटा शेअरींग** : पे अॅज यू ड्राइव्ह विमा योजनेत ग्राहकाला किलोमीटरचा अहवाल द्यावा लागतो. विमा कंपनीच्या गरजेनुसार किलोमीटरची माहिती देण्याची गरज असते.

**विमा हप्त्याची तडजोड** : किलोमीटरनुसार हप्ता आकारला जातो. अनेकदा वाहन चालविण्याची पद्धत बदलते जसे दैनंदिन काम आणि दुर्गम भागात कामासाठी जाणे असो. त्यानुसार तुम्ही अतिरिक्त किलोमीटर खरेदी करू शकता. त्यामुळे विमा हप्त्याबाबत तडजोड करण्याची संधी मिळते.

**थर्ड पार्टी विमा कवच** : किती किलोमीटर वाहन चालविले तरी वर्षभरासाठी थर्ड पार्टी विमा कवच दिले जाते. त्यानुसार सातत्यपूर्ण विमा मिळत राहतो.

**नूतनीकरण आणि टॉप अपचा पर्याय** : विमा कवचात अंतर पडू नये, यासाठी ग्राहकाने विम्याचे नूतनीकरण करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच किलोमीटरची मर्यादा ओलांडली तर ते वाढवून घेण्यासाठी तत्पर राहिले पाहिजे.